भारतीय विद्या भवनचे

# सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय

भवन्स कॅम्पस, मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५८.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त व्याख्यान

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त, आपल्या महाविद्यालयाच्या **प्रशिक्षण व आस्थापना विभागाने** व्याख्यान आयोजित केलेले आहे.

**विषय: महाराष्ट्र डॉ. आंबेडकरांचं काय करणार?**
**वक्ते: श्री. पद्माकर कांबळे (प्रसिद्ध पत्रकार, आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते आणि सामाजिक प्रश्नांचे अभ्यासक)**
**वेळ: मंगळवार, दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता,**
**स्थळ: सेमिनार हॉल ११९**

**श्री. पद्माकर कांबळे यांचा अल्प परिचय:**
पद्माकर कांबळे यांनी खालील विविध सामाजिक उपक्रम राबविलेले आहेत.

- कोवीड-१९ साथजन्य आजारात लागू केलेल्या टाळेबंदीत, प्रशासन आणि माध्यमांशी समन्वय राखत वसई (जि.पालघर) येथील रोजंदारीवरील कुटुंबातील सदस्यांना अन्नपुरवठा. (२०२०)
- रावणगाव, ता.दौंड, जि.पुणे येथील अतिवृष्टी बाधित भूमीहीन दलित कुटुंबातील महिलांना रोख स्वरूपात मुंबई येथून सहाय्यता निधी. (२०२०)
- 'जागतिक महिला दिन' सार्वजनिकरित्या प्रथमच रावणगाव येथे साजरा करण्याची सुरुवात. या निमित्ताने विशेष महिला सहलीचे स्व-पुरस्कृत सलग तीन वर्षे आयोजन. (२०२१ कोल्हापूर, २०२२ महाबळेश्वर, २०२३ कोल्हापूर, २०२५ अजंठा-वेरुळ)
- महिला बचत गटाची स्थापना (२०२३)
- विविध सामाजिक उपक्रमांसाठी स्वेच्छेने देणगी
- प्रशासन, पोलिस, शिक्षण, महसूल, कृषी, सहकार, बॅंकींग आणि पत्रकारिता या क्षेत्रात विविध विभागांशी समन्वय राखत, रावणगाव आणि परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी, महिला, शालेय विद्यार्थी यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी विविध मार्गाने सातत्याने प्रयत्नशील
- राजकारण आणि समाजकारणातील मान्यवरांशी उत्तम संवाद कौशल्य आणि सोबतच दांडगा लोकसंपर्क
- रावणगाव आणि परिसरातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना शैक्षणिक तसेच करिअर विषयी मार्गदर्शन
- **भारतातील नामांकित अशा 'एक्सप्रेस वृत्त समूहा'च्या दैनिक 'लोकसत्ता'साठी राजकीय आणि सामाजिक विषयांवर अभ्यासपूर्ण लेखन करत असताना, कृषी विषयक विषयांना प्राधान्य**
- व्यक्तित्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यास अभ्यास, वाचन आणि लिखाणाची जोड. समाजजीवनाचे अभ्यासक.

डॉ. आंबेडकर यांच्या विचारांची महाराष्ट्राच्या बदलत्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीत समर्पकता समजून घेण्याच्या हेतूने सदर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन मी करतो.

**प्रा. डॉ. मोहन मुरुडी**
**प्र. प्राचार्य**

**दि. १५ एप्रिल २०२५**